11 JUL 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रमाणपत्र अभ्यासातून रोजगाराची संधी

## उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांचे प्रतिपादन : गुणपत्रक, प्रमाणपत्र वितरण समारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

उद्योग व रोजगारक्षम कौशल्य विकसित करण्याची सध्या गरज आहे. त्यामुळे दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवले जातात. या प्रमाणपत्र अभ्यासातून रोजगाराची संधी मिळते, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत सुरू असलेल्या विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम विभागाच्या वतीने आयोजित गुणपत्रक व प्रमाणपत्र वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे होते.

डॉ. कुबल म्हणाले, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचे अध्ययन व अध्यापनात बदल करणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या उद्योजक व रोजगारक्षम कौशल्य विकासासाठी आणखी विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये चार प्रमाणपत्र अभ्यासक्रम दूरशिक्षण केंद्रांतर्गत सुरू केले आहेत. त्यामध्ये विद्यापीठातील केंद्रातून बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन, ट्रॅव्हल व टुरिझम सर्टिफिकेट पदविका अभ्यासक्रम, तर साताऱ्यातील विभागीय केंद्रातून ग्रंथालय व्यवस्थापन व ग्रामीण पत्रकारिता जनसंवाद हे पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

यापैकी बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि ट्रॅव्हल व टुरिझम या अभ्यासक्रमाचे गुणपत्रके व प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. पी. एन. देवळी यांनी केले. आभार डॉ. एन. एस. रणदिवे यांनी केले. यावेळी सहाय्यक कुलसचिव पी. एस. शिरोळे, कक्ष अधिकारी एन. पी. साळुंखे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील, डॉ. सी. ए. बंडगर, डॉ. एस. व्ही. माने विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसोबत उपकुलसचिव डॉ. संजय कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे. सोबत सहाय्यक प्राध्यापक.

तरुण भारत

# दूरशिक्षणच्या नवीन चार अभ्यास केंद्रांना मान्यता

कोल्हापूर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये यंदा चार अभ्यासकेंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच दोन अभ्यासकेंद्रांना प्रत्येकी एक नवीन अभ्यासक्रम देण्यात आला आहे. यामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अभ्यासकेंद्राचा समावेश आहे, अशी माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

- **कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यात नवीन अभ्यासकेंद्रांना प्रारंभ**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत दूरशिक्षण केंद्रातर्फे सध्या ८६ अभ्यासकेंद्र कार्यरत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील आनंदराव आबिटकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडगाव (ता. भुदरगड), सांगली जिल्ह्यातील गजानन कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, बोबलाद (ता. जत) आणि संपतराव माने महाविद्यालय, खानापूर तसेच सातारा जिल्ह्यातील गिरीस्थान आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज महाबळेश्वर यांचा समावेश आहे. तसेच श्रीपतराव चौगुले कला व विज्ञान महाविद्यालय माळवाडी कोतोली (ता. पन्हाळा) या अभ्यासकेंद्रास एम. ए. राज्यशास्त्र तर सातारा येथिल लालबहादूर शास्त्री महाविद्यालय अभ्यासकेंद्रास एम. एस्सी (गणित) हा अभ्यासक्रम नव्याने देण्यात आलेला आहे. विद्यार्थी, गृहिणी, कामगार यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन डॉ. मोरे यांनी केले आहे.

11 JUL 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञान अधिविभागातील ११० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात ११० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये विविध पदावर निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना वर्षाला ३ ते ८ लाखांचे पॅकेज मिळणार आहे

विभागात तंत्रज्ञान व नाविन्यपूर्ण अभियांत्रिकीचे शिक्षण दिले जाते. प्लेसमेंट सेलमार्फत विभागामध्ये, तांत्रिक विषयावर व्याख्यान, चर्चासत्र, करिअर परामर्श, व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम व कार्यशाळांचे आयोजन केले जाते. सेंट्रल प्लेसमेंट सेल व अधिविभागाचे प्लेसमेंट सेल यांच्या मदतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी अनेक कंपन्या भेट देत आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. विभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी गणेश पाटील कार्यरत आहेत.



**कोल्हापूर : बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये विविध पदांवर निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. एस. एन सपली, प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी गणेश पाटील आदी.**

क्रांतीसिंह

# शिवाजी विद्यापीठाच्या तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त दर्जा

कोल्हापूर(प्रतिनिधी):-शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करता येणार आहे.

विद्यापरिषदेच्या शिफारशींवरून व्यवस्थापन परिषदेने हा दर्जा दिला आहे. दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूट (इचलकरंजी), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे, जि. सांगली) या महाविद्यालयांच्या त्यामध्ये समावेश आहे.

स्वायत्त महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच नवीन प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे अधिक सुलभ होणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठाच्या मंजुरीने पीएचडीचे अभ्यासक्रम सुरु करणे, अभ्यासक्रमांची शुल्क रचना निर्धारित करणे अशा अनुषंगिक बाबींसाठीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नामाभिधानाप्रमाणे अभ्यास क्रमांची नावे बदलणे, मूल्यांकनाची पद्धत निश्चित करणे, निकाल जाहीर करणे, गुणपत्रके बहाल करणे यांचीही मुभा मिळणार आहे. विद्यापीठास प्राप्त झालेल्या एकूण पाच अर्जांची रितसर दुबार छाननी करून एकूण तीन स्वायत्त महाविद्यालयांचे अर्ज पात्र करण्यात आले. दरम्यान,नव्या शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक स्वायत्ततेकडे शिवाजी विद्यापीठाने टाकलेले हे महत्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केला.

# लोकमत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

• Estd.1962
"A++" *Accredited by* NAAC (2021) with CGPA 3.52

## प्रवेश प्रक्रिया सूचना २०२३–२०२४
## अधिविभाग/संलग्नित महाविद्यालयांकडील अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी पुर्न:प्रवेश परीक्षा

सन २०२३–२०२४ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग/संलग्न महाविद्यालयांकडील खाली नमूद करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या रिक्त राहीलेल्या जागांसाठी पुर्न: प्रवेश परीक्षा दि.१८/०७/२०२३ रोजी तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर प्रवेश परीक्षेसाठी दि. ११/०७/२०२३ ते दि.१६/०७/२०२३ या कालावधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज भरणा करावेत.

| अ. क्र | अभ्यासक्रमाचे नाव | अ. क्र | अभ्यासक्रमाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | M.Sc. Electronics | 13. | M.Sc. AGPM |
| 2. | M.Sc. Botany | 14. | M.Sc. Medical Information Management |
| 3. | M.Sc. Physics | 15. | M.A. Russian |
| 4. | M.Sc. Zoology | 16. | M.A. Mass Communication |
| 5. | M.Sc. Computer Science | 17. | M.B.A. (Rural) |
| 6. | M.Sc. Microbiology | 18. | M.A./M.Sc. Geography |
| 7. | M.Sc. Environmental Science | 19. | M.Sc. Statistics |
| 8. | M. Sc. Pharmaceutical Microbiology | 20. | M.Sc. Gen. Microbiology |
| 9. | M. Sc Nano Science & Technology | 21. | M.Sc. Biotechnology |
| 10. | B.Sc.-M. Sc. Economics | 22. | M.Sc. Mathematics |
| 11. | B.J. , M.J. | 23. | M. Tech. Rural |
| 12. | B. Lib. & Information Science | | |

तेंव्हा इच्छुक विद्यार्थ्यांनी पुर्न:प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळावरील http://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information या लिंकवर भेट दयावी व पदव्युत्तर प्रवेश विभागाकडील दूरध्वनी क्रमांक ०२३१–२६०९१४२ व २६०९४८८ यावर संपर्क साधावा.

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ११/०७/२०२३

डॉ. व्ही. एन. शिंदे
प्र. कुलसचिव

पुढारी

# रोजगाराच्या संधीसाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम आवश्यक : डॉ. कुबल

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

उद्योग व रोजगारक्षम कौशल्य विकासासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत सुरू असलेल्या विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे होते.

यावेळी सहायक कुलसचिव पी. एस. शिरोळे, कक्ष अधिकारी एन. पी. साळुंखे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील आदी उपस्थित होते.

डॉ. कुबल म्हणाले, आजच्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचे अध्ययन व अध्यापनात बदल करणे गरजेचे आहे.

प्रास्ताविक डॉ. पी. एन. देवळी यांनी केले. डॉ. एन. एस. रणदिवे यांनी आभार मानले.

पुढारी

# 'दूरशिक्षण'च्या नव्या चार अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये यंदा चार अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दोन अभ्यास केंद्रांना प्रत्येकी एक नवीन अभ्यासक्रम दिल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

कोल्हापूर जिल्ह्यात एक आनंदराव आबिटकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडगाव (ता. भुदरगड), सांगली जिल्ह्यात दोन गजानन कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जा. बोबलाद (ता. जत) व संपतराव माने महाविद्यालय, खानापूर व सातारा जिल्ह्यातील एक



गिरीस्थान आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज महाबळेश्वर यांचा समावेश आहे.

श्रीपतराव चौगुले कला व विज्ञान महाविद्यालय माळवाडी कोतोली (ता. पन्हाळा) या अभ्यास केंद्रास एम. ए. राज्यशास्त्र तर सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालय अभ्यास केंद्रास एम.एस्सी. (गणित) हा अभ्यासक्रम नव्याने देण्यात आला आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्राची संख्या ८६ झाली आहे.

पुढारी

# ३८५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेअंतर्गत आजअखेर सुमारे ३८५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. सोमवारी मास्टर ऑफ आटर्स, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन आदी सहा अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला १८३३ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, एम.ए. (हिंदी), जिओलॉजी, बीसीए सायन्स, एम.कॉम. (आयटी), अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, पीजी डिप्लोमा इन डेटा सायन्स, एमएस्सी (शुगर टेक्नॉलॉजी) आदी २१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. भरारी पथकाकडून कोल्हापूर (३) व सातारा (४) अशा सात गैरप्रकारांची नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



# दूरशिक्षण केंद्राच्या चार अभ्यास केंद्रांना मान्यता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये यंदा चार अभ्यास केंद्रांचा समावेश केला आहे, तर दोन अभ्यास केंद्रांना प्रत्येकी एक नवीन अभ्यासक्रम दिल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. यामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अभ्यास केंद्राचा समावेश आहे.

मान्यता दिल्याने अभ्यास केंद्रांची संख्या ८६ इतकी झाली आहे. नव्याने अभ्यास केंद्रांमध्ये आनंदराव आबिटकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडगाव (ता. भुदरगड), सांगली जिल्ह्यातील श्री गजानन कला वाणिज्य



आणि विज्ञान महाविद्यालय, जा. बोबलाद (ता. जत) आणि श्री. संपतराव माने महाविद्यालय, खानापूर, तर सातारा जिल्ह्यातील गिरिस्थान आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज महाबळेश्वर यांचा समावेश आहे. श्रीपतराव चौगुले कला व विज्ञान महाविद्यालय माळवाडी कोतोली (ता. पन्हाळा) या अभ्यास केंद्रास एम.ए. राज्यशास्त्र, तर सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालय अभ्यास केंद्रास एम.एस्सी. (गणित) हा अभ्यासक्रम नव्याने दिला आहे.

11 JUL 2023
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगारासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम आवश्यक : डॉ. कुबल

कोल्हापूर : उद्योग व रोजगारक्षम कौशल्य विकासासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम आवश्यक आहेत, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत सुरू असलेल्या विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम विभागातर्फे आयोजित गुणपत्रक व प्रमाणपत्र वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे होते. शैक्षणिक वर्ष २०२३- २४ मध्ये चार प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले होते. त्यामध्ये मुख्य कार्यालयातून बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि ट्रॅव्हल व टुरिझम सर्टिफिकेट कोर्स सुरू केले होते. यातील विद्यार्थ्यांना गुणपत्रके प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. पी. एन. देवळी यांनी केले. आभार डॉ. एन. एस. रणदिवे यांनी मानले. सहायक कुलसचिव पी. एस. शिरोळे, कक्ष अधिकारी एन. पी. साळुंखे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील, डॉ. सी. ए. बंडगर, डॉ. एस. व्ही. माने आदी उपस्थित होते.

सकाळ

# 'दूरशिक्षण'च्या चार अभ्यासकेंद्रांना मान्यता

कोल्हापूरः दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये यंदा चार अभ्यासकेंद्रांचा समावेश करण्यात आला आहे. दोन अभ्यास केंद्रांना प्रत्येकी एक नवीन अभ्यासक्रम देण्यात आला आहे. यामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अभ्यासकेंद्रांचा समावेश आहे. या अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. त्यामुळे सध्या अभ्यासकेंद्राची संख्या ८६ इतकी झाली आहे. जिल्ह्यात आनंदराव आबिटकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडगाव (ता. भुदरगड), सांगली जिल्ह्यात गजानन कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जा. बोबलाद (ता. जत) आणि संपतराव माने महाविद्यालय,खानापूर तसेच सातारा जिल्ह्यातील गिरीस्थान आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज महाबळेश्वर या केंद्रांचा समावेश आहे. चौगुले कला व विज्ञान महाविद्यालय कोतोली (ता. पन्हाळा) या अभ्यासकेंद्रास एम.ए.राज्यशास्त्र, तर सातारा येथील शास्त्री महाविद्यालय अभ्यासकेंद्रास एम.एस्सी (गणित) हा अभ्यासक्रम नव्याने देण्यात आला आहे.